VOL. No. 42 No. 1 of 2007

# JOURNAL OF

# SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

## HUMANITIES & SOCIAL SCIENCES

# JOURNAL OF SHIVAJI UNIVERSITY

(HUMANITIES AND SOCIAL SCIENCES)

VOL. 42-1 2007

***KOLHAPUR - 416 004***

***INDIA***

# Journal of Shivaji University, Kolhapur

## Vol. 42, No. I of 2007

## CONTENTS


| Sr. No. | Title | Page No. |
|---|---|---|
| 1. | IMPACT OF PURITAN REVOLUTION ON BRITISH CONSTITUTION - SHIVAJI S. PATIL | 1 |
| 2. | THE REVOLT OF THE GARRISONS (GADKARIS) IN KOLHAPUR STATE IN 1844 - I. H. PATHAN | 17 |
| 3. | CONFLICT MOTIF IN R. K. NARAYAN'S 'THE DARK ROOM' - Mrs. S. A. MUJUMDAR | 29 |
| 4. | "A STUDY OF LABOUR MOVEMENT IN CHH. SHAHU'S REIGN IN THE KOLHAPUR STATE (1894-1922)" - RAHUL S. MHOPARE* | 39 |
| 5. | COMARATIVE STUDY OF THE OUTCOME OF TEACHING SELECTED UNITS IN PHYSICS BY INDUCTIVE THINKING MODEL AND INQUIRY TRAINING MODEL AT THE HIGHER SECONDARY LEVEL - BHANUDAS SHANKAR NIMBALKAR | 51 |
| 6. | नागार्जुन और आनंद यादव के कथा साहित्य में ग्राम-जीवन : तुलनात्मक विमर्श : एकनाथ श्री. पाटील | 57 |
| 7. | ''जिन्दगीनामा में ग्राम्य जीवन'' - कु. वैशाली चव्हाण | 65 |
| 8. | उत्खनन : मानवी नातेसंबंधातील विशुद्धतेचा शोध - गजानन रा. अपिने | 71 |
| 9. | कृ. प्र. खाडिलकरांचे 'कीचकवध' : समकालीन राजकीय प्रबोधनाचा दस्तऐवज - दत्ता पाटील | [illegible] |
| | शिवाजी विद्यापीठाच्या ग्रंथालयातील अप्रकाशित हस्त लिखिते | |
| 10. | प्राचीन भारतीय रसशास्त्रावरील ग्रंथ - श्री. गणेश नेर्लेकर | [illegible] |
| | राजवैद्य जगताप संग्रहातील महत्त्वाची अप्रकाशित कागदपत्रे | [illegible] |
| 11. | एक अप्रकाशित ग्रंथ : शिव कल्याण विरचित भागवत दशम स्कंध टीका - ग. वा. तगारे | [illegible] |
| 12. | डॉ. ग. वा. तगारे - डॉ. अशोक चौसाळकर | [illegible] |

# उत्खनन : मानवी नातेसंबंधातील विशुद्धतेचा शोध

गजानन रा. अपिने

साठोत्तर मराठी कादंबरी लेखनाचा विचार करता स्त्री आणि स्त्रियांचे अनुभवविश्व यांना केंद्रस्थानी मानून गंभीरपणे कादंबरीलेखन करणाऱ्या लेखिका म्हणून कमल देसाई, अंबिका सरकार, आशा बगे, शांता गोखले, सानिया, मेघना पेठे, कविता महाजन इत्यादींचा उल्लेख करता येईल. याच समानपातळीवर वरील लेखिकांप्रमाणेच स्त्री-केंद्रित कादंबरीलेखन केलेल्या एक महत्त्वपूर्ण लेखिका म्हणून गौरी देशपांडे यांचे नाव अधोरेखित करावे लागते. आपल्या कादंबरीत चित्रित केलेल्या अनुभवविश्वाच्या नावीन्यामुळे, बुद्धिवादी आशयसूत्राच्या वेगळेपणाने, आणि कादंबरी रचनातंत्रातील कल्पकतेमुळे गौरी देशपांडे यांनी प्रस्तुत कालखंडात फक्त स्त्री-लिखित कादंबऱ्यापुरतेच नव्हे; तर एकूणच मराठी कादंबरीलेखनात आपल्या कादंबऱ्यांची स्थाननिश्चिती करण्यात यश मिळविले आहे.

'उत्खनन'(२००२) ही गौरी देशपांडे यांची प्रकाशित झालेली शेवटची कांदबरी. त्यांच्या यापूर्वीच्या कादंबऱ्यांच्या तुलनेत 'उत्खनन' या कादंबरीचे कथानक, आशयविश्व आणि रूपबंध यातील नावीन्य स्पष्टपणे जाणवते. प्रस्तुत लेखात त्याचाच शोध घेतला जाणार आहे.

प्रामुख्याने गौरी देशपांडे यांनी 'एकेक पान गळावया', 'निरगाठी आणि चंद्रिके ग सारिके ग', 'तेरूओ आणि काही दूरपर्यंत', 'दुस्तर हा घाट आणि थांग', 'मुक्काम', 'गोफ' आणि शेवटची 'उत्खनन' असे एकूण कादंबरीलेखन केले. यामध्ये प्रत्येक कादंबरी जरी स्वत:चे स्वतंत्र अस्तित्व सिद्ध करत असली तरी त्यांच्या सर्व कादंबऱ्याचे एकत्रित अवलोकन करता काही एक अंत:सूत्र सर्व कादंबरीत कमी-जास्त प्रमाणात समानपातळीवर वावरतात. याबाबत विचार करता त्यांच्या कादंबऱ्या व्यक्तिनिष्ठ जीवनमूल्यांचा पुरस्कार करताना दिसतात. कादंबऱ्यात मानसिक पातळीवरील वास्तव केंद्रस्थानी येते. 'प्रेम' हा कथानकाचा स्थायीभाव त्यांचा कादंबऱ्यात आढळतो. त्यांच्या कादंबऱ्यामधून येणाऱ्या नायक-नायिकांच्या जीवनाचा स्तर मध्यमवर्गीय, उच्च मध्यमवर्गीय असा आहे. याशिवाय आपल्या कादंबऱ्यातून विवाहसंस्था, कुटुंबसंस्था, नातेसंबंधाविषयक कल्पनाबाबत गौरी देशपांडे यांनी काही मूलभूत प्रश्न उपस्थित करण्याचा प्रयत्न केला आहे.

या सगळ्या पार्श्वभूमीवर गौरी देशपांडे यांची 'उत्खनन' ही कादंबरी तिच्या पूर्वकादंबऱ्याशी नाळ जोडून येत असली तरी आणखी काही घटक या कादंबरीत टप्प्याटप्प्याने केंद्र होताना दिसतात. ते म्हणजे मानवी नातेसंबंध, जगण्यातील एकाकीपणा, 'माणूस' म्हणून त्याच्यासोबत येणारी हतबलता, मृत्यूची जाणीव, जीवनानुभवाचे सूक्ष्म विश्लेषण करून निवेदनाच्या ओघात कित्येक घटना-प्रसंगांच्या माध्यमातून जीवनविषयक काढलेले काही लक्षणीय निष्कर्ष इत्यादी. एकूणच अशा अनेकपदरी आशयाचे स्वरुप 'उत्खनन' मधून नेटकेपणाने अभिव्यक्त झालेले आहे. आणि याचाच परिणाम गौरी देशपांडे यांच्या अन्य कादंबऱ्यांच्या तुलनेत या कादंबरीत लेखकपणाच्या समृद्धतेचे दर्शन घडते.

---

संशोधक विद्यार्थी : मराठी विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

- २ -

या कादंबरीचे कथानक दुनिया आणि तिच्यासह अनंता, मणी, दया, अर्णव या कादंबरीतील प्रमुख पात्राभोवती फिरत राहते. दुनिया ही विद्यापीठात पुरातत्त्वशास्त्र विभागात प्राध्यापिका आहे. विद्यार्थीदशेत असताना वयाच्या १८-१९ व्या वर्षी तिचा अनंताशी परिचय होतो. अनंताच्या जीवनविषयक असणाऱ्या मुक्त-दर्दी कल्पनेबाबत, त्याच्या जगण्याच्या स्वतंत्र धाटणीबाबत दुनियाला जबरदस्त आकर्षण वाटायला लागते. पुढे त्यांच्यात प्रेमसंबंध निर्माण होऊन तिला अनंतापासून दिवस जातात. याचा थांग अनंताला लागताच तो तिच्यापासून पसार होतो. दरम्यान दुनियाच्या या गोंधळलेल्या अवस्थेत बापू (दुनियाचे वडील) दुनियाला धीर देतात आणि तिच्या पोटात वाढणाऱ्या मणीला लौकिक जीवनातही सन्मानाने वाढवितात. पुढे पुरातत्त्वशास्त्र विषयात पीएच. डी. पदवी संपादनाच्या निमित्ताने दुनिया परदेशीय विद्यापीठात असताना तिचा दयालशी (दयाल हा खुद्द भारतीय) परिचय होतो. दयाल दुनियाच्या आत्ममग्न, अंतर्मुख स्वभावाच्या प्रेमात पडतो. दुनियाच्या पूर्वजीवनातील मणीसह सगळ्या गोष्टी माहीत झाल्यानंतरही दुनियाशीच विवाहबद्ध होण्याचा निर्णय घेतो. मणीचा पुढे जब्बारशी विवाह होतो आणि वर्षाच्या आतमध्येच त्यांचा घटस्फोटाच्या दिशेने प्रवास होतो. दरम्यान दुनियाचं विभागप्रमुखपद हुकलेलं असतं आणि डॉ. अंक्लेसारिया यांच्या निवृत्तीनंतर विभागप्रमुखपद आपल्यालाच मिळेल या भ्रमात असलेली दुनिया अपेक्षाभंगानंतर पुन्हा उत्खननात स्वत:ला गुंतवून घेण्याचा प्रयत्न करते. आयुष्याच्या उत्तरकाळात अनंताला 'ब्रेनट्यूमर' झाल्याने शेवटी का होईना दुनियाला एकदा भेटावं या उद्देशाने तो दुनियाच्या घरी येतो. दयालसह मणीसुद्धा अनंताचे स्वागत करतात. आणि स्वत: दयाल, मणी दोघेही पेशाने 'न्यूरोलॉजिस्ट' असल्याने अनंताच्या ब्रेनट्यूमरवर शस्त्रक्रिया करावयाचे निश्चित करतात. एकूणच संपूर्ण कादंबरीत अशा स्वरूपाचे कथानक येते.

'उत्खनन' मध्ये येणाऱ्या पात्रांचा विचार करता ती पात्रे वर्तमानातील प्रत्यक्ष वास्तवाला थेटपणे सामोरे जाताना दिसतात. याबाबत ती कशाही स्वरूपाची तक्रार करताना दिसत नाहीत किंवा अन्य कोणत्या घटकांना / व्यक्तींना दोषही देत नाहीत. याप्रसंगी ती पात्रं प्रश्नांच्या / समस्यांच्या मुळाशी जाऊन खरी उत्तरे, निष्कर्ष शोधण्याचा प्रयत्न करतात. याविषयी कांदबरीत येणारे चांगले उदाहरण म्हणजे, दुनियाला दिवस गेल्याचे लक्षात आल्यानंतर आपल्या 'स्व' ला अंकुर फुटतो आहे हे गृहीत धरून अनंता दुनियापासून लांब जातो. यापूर्वी म्हणजे अनंताचं नाव 'अनंतनारायण' असे आहे हे दुनियाला समजायला जवळ-जवळ एक वर्ष जावे लागते. या सगळ्या आधारावर अनंताच्या सोडून जाण्याचं दुनियाने काढलेला एक निष्कर्ष म्हणजे, '' त्याने तसे का करावे हे मला जेव्हा कळले, तेव्हाच कळले की तो जो गायब झालाय तो फक्त जबाबदाऱ्या टाळण्यासाठी नव्हे, तर आपल्या आधीच नाकारलेल्या 'स्व' ला हा जो नवा धुमारा फुटतोय, तो नाकारण्यासाठी'' (देशपांडे गौरी, २००३, पृ. १५) यासारखीच आणखी काही उदाहरणे दयाल, बापू, मणी, अनंता, अर्णव यांच्या बाबतीतसुद्धा कांदबरीत दाखवता येतात. याचा अर्थ दुनिया आणि कादंबरीतील वरील नमूद केलेली पात्रे कधी-कधी भावनांकित वाटत असली तरी त्यांचा रोख बुद्धिवादी विचारसरणीकडे आहे. ही मंडळी आत्मचिंतन, आत्मपरीक्षण करत स्वत:लाच शोधत, स्वत:लाच मांडत जाताना दिसतात. याविषयी प्रस्तुत काळातील स्त्री कांदबरीकार आणि त्यांच्या प्रमुख कादंबऱ्याविषयी

रेखा इनामदार–साने यांनी केलेले भाष्य 'उत्खनन' बाबतही महत्त्वपूर्ण वाटते ते असे की, ''आपणच आपल्यासारखे असणे, आयुष्यभर घडत–मोडत जाणे, निवड करण्याचे स्वातंत्र्य वापरणे, त्यातून स्वत:चा मूल्यभाव व्यक्त करणे आणि यावाचून अन्य काही पर्याय / इलाजच उपलब्ध नसल्याने अखंड वेदना, व्याकुळता व थैमान घालणाऱ्या प्रश्नांच्या भोवऱ्यात अडकणे, त्यातूनही स्वत:चा शोध घेण्याची प्रतिज्ञा कायम राखणे हे या काळाच्या अखेरच्या टप्प्यातील गौरी देशपांडे, अंबिका सरकार, आशा बगे, शांता गोखले आणि सानिया यांच्या कादंबऱ्यातून प्रत्ययास येते.'' (संपा. खोले विलास, २००२, पृ. ३५) काहीसे असे 'उत्खनन' मधूनही पात्रे तपासताना जाणवत राहते. विशेषत: 'उत्खनन' मधील पात्राविषयी याशिवायचे एक आकलन असे की, या कादंबरीतील ही मंडळी एखाद्या गोष्टीबाबत टोकाची भूमिका घेणारी, अविचार, भावनातिरेकाने निर्णयापर्यंत पोहचणारी किंवा क्रांतिकारीवृत्तीची अशी नाही आहेत. स्वत:ला हवं असलेलं घडवून आणण्यात किंवा आणताना ते कोठेही अभिनिवेशाने वागताना दिसत नाहीत. तसेच कोणत्याही घटना–प्रसंगावर तडकाफडकी निर्णय घेऊन किंवा प्रतिक्रिया देऊन मोकळेही होत नाहीत. या साऱ्यातून एक गोष्ट निदर्शनास येते की, या कादंबरीत लेखिकेची एकूणच व्यक्तीकडे, वास्तवाकडे बघण्याची दृष्टी सूक्ष्म झाली आहे. याचा परिणाम लेखिकेला पात्रांच्या मानसिक पातळीवरील वास्तवाचे कलात्मक विश्लेषण करण्यात यश आले आहे.

या कांदबरीद्वारे गौरी देशपांडे यांनी भारतीय माणसांच्या नातेसंबंधाबाबत आजच्या काळाला जोडून घेऊन लक्षणीय भाष्य केले आहे. एका अर्थाने लेखिका स्त्री–पुरुषसंबंध, विवाहसंस्था, कुटुंबसंस्था तसेच अन्य सामाजिक, सांस्कृतिक परिप्रेक्षातून निर्माण होणाऱ्या नातेसंबंधावर 'क्ष' किरण सोडून ते तपासून घेती आहे. शिवाय नात्यातील साचलेपणावर, नातेसंबंधातील रूढ संकेताविषयी प्रश्न उपस्थित करून त्या ठिकाणी नव्या शक्यता रुजवण्याचा त्यांनी केलेला प्रयत्न महत्त्वाचा वाटतो. या सगळ्यातून संबंधित कादंबरीचे रूप भारतीय समाजव्यवस्थेतून निर्माण होणाऱ्या मानवी नातेसंबंधाच्या कित्येक कल्पनांना धक्के देणारे असे झाले आहे. जब्बार (रूढार्थाने गृहीत धरता कायद्याने झालेला मणीचा पती) मणीला 'अक्करमाशी' असे घोषित करतो आणि तिला आपल्या गळ्यात फसवून बांधले असे गृहीत धरून दुनियाला दोष देतो. तेव्हा दुनियाने मणीच्या जन्मापासून तिचा डॉक्टरी पेशापर्यंतचा डोळ्यात भरणारा प्रवास नजरेसमोर आणून दिलेली प्रतिक्रिया नातेसंबंधाकडे बघण्याची नवी दृष्टी विकसित करते. ''त्याचे बोलणे इतके गैरलागू आणि निरर्थक होते, की मला हसायलाच यायला लागले. मणी ही मणी होती. ती अनौरस असली काय किंवा स्वयंभू असली काय किंवा माझी आणि दयालची राजरोस लेक असली काय, काय फरक पडत होता?'' (देशपांडे गौरी, २००३, पृ. ९४) एकूणच पारंपरिक समाजमान्य नातेसंबंधातील रचना नाकारून दुनिया येथे मणीने पोटात असतानाच अनंताने बाप म्हणून नाकारलेल्या क्षणापासून स्वतंत्रपणे व्यक्त केलेल्या 'न्यूरोसर्जन' पर्यंतच्या वाटचालीला अधोरेखित करून केलेले विधान अर्थपूर्ण वाटते.

उत्तरकाळात अनंता दुनियाला भेटण्यासाठी येतो. त्याचवेळी फक्त रक्तसंबंध म्हणून अनंताचा बाप म्हणून स्वीकार करण्याचं मणी नाकारते. त्या दरम्यान दुनियाला तिनं सुनावलेलं उत्तर नात्यातील रक्तसंबंधापेक्षा कमावलेला महत्त्व देणारं आहे. ते असे की, ''हे बघ, ज्या माणसाची मला काडीची माहिती नाही, ज्याचं मी

काहीएक देणघेणं लागत नाही, त्याला मी 'बाप' म्हणावं आणि त्याचा एकाएकी माझ्या आयुष्यात भस्कन पाय टाकण्याबद्दल काही आकांडतांडव करावं ही तुझीच अपेक्षा कडेलोट आहे! तू माझी आई आहेस, आप्पू माझा बाप आहे, तुम्ही दोघं, आता नसणारे आज्जू-आजी, अभयामावशी, कोमल, अणू, सती, तिरक्या... ही सारी माझ्या आयुष्याची शाश्वत सत्यं आहेत. हा अचानक उगवणारा माणूस तुझा जुना मित्र आहे. हे मानायला तयार आहे मी, आणि तो आमचा पेशंट होऊ शकेल, त्याला आम्ही इलाज करूहेही. पण 'खऱ्या' बापाची बात सोड तू!'' (पृ. ८१) या कादंबरीतील मणी तिरक्यालाही (घरातील मांजराला) आपल्या जगण्यातील शाश्वत सत्य मानते आहे. आईची जवळची मैत्रीण या नात्याने जोडल्या गेलेल्या अभया, कोमल, अणू, सती यांना ती तिच्या आयुष्यातील शाश्वत सत्य मानती आहे. म्हणजे लेखिका नातेसंबंधातील न पटणाऱ्या गोष्टीला नाकारत असताना त्याचवेळी नात्यातील नव्या जाणिवांना जागा करू पाहत आहे. समाजव्यवस्थेच्या साचलेपणातून रूढार्थाने नात्यांचा अर्थ न घेता नव्या दृष्टीतून माणूस, आपलेपणा, जवळीकता यांना केंद्रस्थानी ठेवून त्यांच्यासोबत येणाऱ्या नात्यांचा अर्थ उकलण्याचा प्रयत्न करते. ह्या विवेचनास पुष्टी मिळेल असे आणखी काही संदर्भ कादंबरीत (पृ. ११, ३७, ५८, ८१ इ.) दाखविता येतात.

मुख्यत्वे या कादंबरीमधून धीरगंभीरपणे अतपासून इतिपर्यंत जागा बदलून दुनिया, अनंता, दयाल, मणी या पात्रांच्याद्वारे मानवी जगण्यातील एकाकीपणाचे दर्शन घडत राहते. हे एकाकीपण, तुटलेपण त्यांना चिकटूनच येते. अशावेळी दोन गोष्टी घडत असतात. एक म्हणजे अशा एकाकीपणात-तुटलेपणात स्वत:तच हरवून जाणे आणि दुसरे या एकाकीपणातून वाट काढत कृतिशीलतेकडे वळणे. या कांदबरीतील पात्रांचे याबाबत विचार करता ते कृतिशीलतेद्वारे आपल्या एकाकीपणालाही मूल्य प्राप्त करून देतात, असे दिसते. याचे चांगले उदाहरण म्हणजे दुनिया अशाप्रसंगी उत्खननच्या माध्यमातून आपल्या अभ्यासविषयाच्या संशोधनात गढून जाते. तर मणी, अर्णव, दयाल ही मंडळी स्वत:च्या एकाकीपणाला बगल देऊन तुरुंगातील माणसांना, वेड्याच्या इस्पितळातील माणसांना, आयुष्यभर फूटपाथ हेच जगण्याचे साध्य आणि साधन असणाऱ्या भिकाऱ्यांना, अपंग, जगाला नको असलेल्या म्हाताऱ्याकोताऱ्यांना स्वत:चा उपयोग होईल यासाठी धडपडतात. याविषयी अर्णव दुनियाला मणीबाबत सांगताना म्हणतो, ''ती आठवड्यातून एक दिवस माझ्याबरोबर फिरते, ज्यांना वैद्यकिय मदतीची गरज आहे. त्यांना ती उपलब्ध करून द्यायला धडपडते. क्वचित कधी-कधी आप्पूही येतो आमच्याबरोबर'' (पृ. ५६)

'उत्खनन' मधून येणारा आणखी एक महत्त्वपूर्ण पदर म्हणजे विवाहसंस्थेविषयीचे विवेचन. विवाहसंस्थेतील फोलपणा लेखिकेला जाणवला आहे. परंतु त्याला ठोस अशी पर्यायी व्यवस्था अजून तरी समाजात उदयाला आलेली नाही याचं पुरतं भानही लेखिकेला आहे. त्यामुळे या कांदबरीत लेखिका या संस्थांच्या केवळ पुनर्मांडणीचा विचार करत नाही, तर जगताना ह्या सर्वाला कितपत स्थान द्यायचं याविषयी चिंतन करताना दिसते. एकूणच कांदबरीत विवाहसंस्था, समाजामध्ये त्याविषयी असलेली सद्यस्थिती, आधुनिक काळातील जगण्याच्या संदर्भामुळे विवाह संस्थेविषयीची बदलती मानसिकता याबाबतचे विवेचन सभोवतालच्या वास्तवाचे भान राखून येते. मणी लग्नाला विरोध करत आहे. ''कशाला लग्न करायचं? मला मुलंबाळं नकोत, लौकिकाला काय जो धक्का बसेल, त्यानं माझं

काही वाकडं होणार नाहीये, पैशासाठी मी जब्बारवर अवलंबून नाही; मग हे उपचारच करण्यात काय अर्थ आहे? विशेषत: ते मान्य नसताना?'' (पृ. २३) यावर दुनियाला वाटतं, ''तिने लग्न करायलाच हवे असे काही मला वाटत नव्हते; पण एकमेकांबरोबर संसार थाटायचा, तर का करू नये, असेपण वाटत होते. इतकी वर्षे, इतकी लग्ने पाहिल्यावर मणीचे पटत होते, की लग्नसंस्थेत संस्था म्हणून तरी काही अर्थ नाही; पण तिला फारसे ठाम, स्वीकारणीय दुसरे पर्यायही अजून तरी दिसत नव्हते.''( पृ. २३) त्यामुळे संबंधित संस्था स्वीकारण्याविषयी, नाकारण्याविषयी अथवा त्याला पर्याय निश्चित करण्याविषयी विचार करण्यापेक्षा त्यातून निर्माण झालेल्या कोंडीवरती उत्तर शोधणे दुनियाला महत्त्वाचे वाटते आणि त्यातून ती काही निष्कर्षापर्यंत येते. म्हणजे जब्बार आणि मणी यांच्या एकत्र येण्यात अथवा असण्यात एकदा लग्न केले आणि आता इतर मार्ग बंद झाले हे कारण असू नये तर त्यांच्या एकत्र असण्यात, ''ते एकमेकांना आवडले म्हणून, एकमेकांबरोबर आयुष्य काढावेसे त्यांना वाटते म्हणून'' (पृ. २६) अशी कारणं असली पाहिजेत. म्हणजे इथे प्रत्यक्ष जगण्याला, त्यातील लयबद्धतेला असलेलं महत्त्व लक्षात येते.

'उत्खनन' वाचत असताना एका पातळीवरती अनिल दामले यांच्या 'गौतमची गोष्ट' या कादंबरीची आठवण होते. कांदबरीच्या सुरुवातीलाच ''मी गौतम सहस्त्रबुद्धे. माझा जन्म वयाच्या पस्तिसाव्या वर्षी मुंबईतल्या एका पोलिस स्टेशनच्या लॉकअपमध्ये झाला.'' (दामले अनिल, १९९८, पृ. १) असे चकवा देणारे विधान येते. मग हा गौतम कोण? त्याच्या निर्मितिप्रक्रियेमागील पार्श्वभूमी कादंबरीत पुढे-पुढे स्पष्ट व्हायला लागते. 'उत्खनन' मध्येसुद्धा असे काहीसे दाखविता येईल. कादंबरीच्या सुरुवातीलाच अचानक वयाच्या पन्नाशीची दुनिया उत्खननला जायच्या तयारीत असलेली अशी दाखवून दुनियाशी या-ना-त्या कारणाने दयाल, अर्णव, अनंता, मणी ही पात्रं जोडलेपणाने अभिव्यक्त व्हायला लागतात. आणि मग पुढे कादंबरीभर दुनिया अधून-मधून, तुकड्या-तुकड्याने आत्मसंवादाच्या पातळीवरती आपल्या जन्मापासून पन्नाशीपर्यंतचा इतिहास तिला जोडून येणाऱ्या अन्य माणसांसह विश्लेषकवृत्तीने, निष्कर्ष काढत उलगडत राहते.

प्रस्तुत कादंबरीत चित्रित घटना-प्रसंग एकसलगपणे येत नाहीत किंवा पारंपरिक कादंबरी रचनातंत्राप्रमाणे 'सुरुवात-मध्य-शेवट' असेही 'उत्खनन' चे स्वरूप नाही. तर दुनिया स्वत:शी आत्मसंवाद साधत असताना येणाऱ्या आठवणींच्या सुट्या-सुट्या तुकड्याने कादंबरी आकाराला येते. रूढार्थाने काळाच्या निकषावरती त्या आठवणी स्वत:चा क्रम सिद्ध करू शकत नाहीत. परंतु विस्कळीत स्वरूपात संबंधित आठवणी कादंबरीत येत असल्या तरी स्वत:चा एकमेकांशी असलेल्या संदर्भाचा एक क्रम त्यांना प्राप्त झाला आहे. त्याचा परिणाम सुटे-सुटे काळांशी विसंगत अनुभव वाचत असताना कुठेही तुटकपणा न जाणवता दुनियासह कादंबरीतील पात्रांचेही जीवन आकलनाच्या पातळीवर उलगडत जाते.

प्रामुख्याने कादंबरीतील आशयद्रव्य, कथानक ह्या बाबी संबंधित कादंबरीच्या रूपनिर्मितीवरती प्रभाव टाकत असतात. नव्हे तर रूपबंधाच्या त्या प्रमुख प्रेरणा ठरत असतात. म्हणजेच कादंबरीतील रूपबंध हे कादंबरीतील आशयसूत्र, कथानक, पात्रनिर्मितिप्रक्रिया, भाषाशैली, कालावकाश या द्रव्यातून आकार घेत असते. 'उत्खनन' च्या रूपबंधाचा विचार करता कादंबरीतील कथानक, आशयसूत्राच्या मागणीतून या कादंबरीच्या रूपाची

नावीन्यपूर्ण निर्मिती झाली आहे, असे म्हणावे लागेल. मुख्यत्वे कादंबरीच्या यशस्वीतेसाठी कलात्मक सामर्थ्य जितके आवश्यक असते तितक्याच प्रमाणात कादंबरी निर्मितिप्रक्रियेच्या तांत्रिक कौशल्याचीसुद्धा आवश्यकता मान्य करावी लागते. याच्याशी संबंधित आर. जी. कॉलिंगवूड यांचे एक मत महत्त्वपूर्ण वाटते. ते म्हणजे, ''तंत्र सदोष असूनही श्रेष्ठ प्रतीच्या कलात्मक सामर्थ्याद्वारे सुंदर कलाकृती निर्माण होऊ शकतात. उलटपक्षी, अगदी घोटून तयार केलेले तंत्र असूनही, जर का कलात्मक सामर्थ्याचा अभाव असेल तर उत्कृष्ट कलाकृतींची निर्मिती होऊ शकत नाही. मात्र असे असले तरी, काही एका प्रमाणात तांत्रिक कौशल्य अवगत असल्याखेरीज कोणत्याही कलाकृतीची निर्मिती होऊच शकत नाही; आणि अन्य गोष्टी समान असताना, जितके तांत्रिक कौशल्य उत्कृष्ट असेल तेवढी कलाकृती उत्कृष्ट उतरेल,'' (मालशे स. ग. / मालशे मिलिंद (अनु.), २००४, पृ. ३१) या अर्थाने विचार करता कलात्मक सामर्थ्य आणि निर्मितिप्रक्रियेतील तांत्रिक कौशल्य या दोन्हीचा तोल सांभाळण्यात, त्या दोन्हीकडे तितक्याच जबाबदारीने लक्ष देण्यात लेखिका 'उत्खनन' मध्ये यशस्वी झाली आहे. 'उत्खनन' मधून व्यक्त होणारे जीवनदर्शन, त्यातील पात्रे, त्यांच्या जगण्याचा स्तर, जगण्याविषयी स्वत:ची असलेली स्वतंत्र मते-भूमिका, स्वत:शी-स्वत:च्या भूमिकांची ठाम असल्यामुळे त्यामूलक उद्‌भवणाऱ्या घटना-प्रसंगाला थेटपणे सामोरं जाणं, त्यासंबंधी भल्या-बुऱ्या दोन्ही स्वरूपाच्या प्रतिक्रियांना मुक्तपणे स्वीकारणं या साऱ्यातून संबंधित कादबरीच्या आशयाचे वेगळेपण जसे अधोरेखित करता येते त्याप्रमाणे अशा स्वरूपाच्या आशयाची मागणी म्हणून येणाऱ्या या कादंबरीतील रूपाचेसुद्धा स्वतंत्र अस्तित्व सिद्ध होते.

या कादंबरीतील कथानकच मुळी दुनिया, अनंता, दयाल, मणी यांच्या मूल्ययुक्त प्रयोगशील जगण्यातून आकारास येते. म्हणजे वयाच्या १८-१९ व्या वर्षी अनंतापासून दिवस गेल्याने खचून न जाता पोटातल्या मणीला जन्म देण्याचा, मुक्तपणे वाढविण्याचा, दुनिया निर्णय घेते. दयालला 'दुनिया-मणी' याविषयीची पार्श्वभूमी माहिती होऊनही दुनियाचीच जीवनसाथी म्हणून निश्चिती करतो. मणी जब्बारसोबत पटत नसल्याने तडजोड करत जीवन जगण्याचा निर्णय न घेता घटस्फोटाच्या निर्णयापर्यंत येते. अनंताला भस्कन आपल्या जगण्यात पाय घालू न देता फक्त 'आईचा एक जुना मित्र' आणि 'स्वत:चा एक पेशंट' म्हणून त्याचा विचार करते. अनंता 'स्व' ची अजिबात ओळख होऊ नये, 'स्व' ला अंकूर फुटू नये यासाठी धडपडत असतो. आणि याचा परिणाम म्हणून तो आपल्या जगण्याचे, कामांचे स्वरूप-ठिकाण आयुष्यभर बदलत राहतो. मुख्यत्वे अनंता, दुनिया, मणी, दयाल ही पात्रं जाणीवपूर्वक जगतात असे नव्हे तर त्यांच्या स्वत:च्या विचारप्रक्रियेने त्यांचं जगणं अशा स्वरूपाने नियत झाले आहे. येथे कुठेही अभिनय किंवा ठरवून केल्याप्रमाणे ही पात्रं जगत नाहीत. एकूणच या पात्रांच्या स्वतंत्र जगण्याचा, त्यांच्या विभिन्न जीवनानुभवांचा परिणाम कादंबरीच्या रूपबंधावरती झाला आहे.

आत्मसंवादाच्या पातळीवरती दुनियाच्या तृतीयपुरुषी निवेदनाने कादंबरी विकसित होत असताना स्वतंत्र, सकस अशा अभिव्यक्तिशैलीमुळे कादंबरीतील आशयाच्या, रूपाच्या कक्षा रुंदावल्या गेल्या आहेत. याचे चांगले उदाहरण म्हणजे 'लघुकादंबरी' सारख्या मुळात कमी अवकाशाच्या वाङ्मयप्रकाराची अभिव्यक्तीसाठी निवड करूनही एकाचवेळी तीन पिढ्यांचे चित्रण कादंबरीतून व्यक्त झाले आहे. घटना-प्रसंगाच्या पातळीवरील एक जग

आणि त्याचवेळी त्यावरील प्रतिक्रियातून निर्माण होणाऱ्या विचार-प्रक्रियेतील एक जग अशा दोन अंगानी 'उत्खनन' आकारास येते. कादंबरीतील कथानकाची सुरुवात दुनियाच्या १८-१९ व्या वर्षापासून होते आणि तिच्या पन्नासाव्या वर्षांपर्यंत तिच्यासह अन्य पात्रांचे जीवनचित्रण कादंबरीत येते. एकूणच कादंबरीत ३०-३१ वर्षाचा कालखंड येत असला तरी एकाचवेळी तीन पिढ्यांचे चित्रण त्यामधून येते. त्यातील पहिली पिढी बापू-आई यांची, दुसरी पिढी दुनिया, अनंता, दयाल, अभय यांची आणि तिसरी पिढी मणी, अर्णव, जब्बार, तीर्थंकर इत्यादींची.

'उत्खनन' मध्ये आत्मसंवादातून आठवणींचा, घटना-प्रसंगांचा क्रम पुढे मागे, खाली-वर असे क्रम चुकवून येत असला तरी, म्हणजे गतकालीन घटना-प्रसंगांचा काळ एकमेकात मिसळून येत असला तरी कादंबरी वाचत असताना विस्कळीत वाटत नाही. विशेषत: गौरी देशपांडे यांच्या 'उत्खनन' पूर्वीच्या कादंबऱ्यांचे अवलोकन केले तर एक गोष्ट स्पष्टपणे जाणवते ती ही की, त्यांच्या कादंबऱ्यात घटना-प्रसंगांच्या मांडणीपाशी येऊन कादंबरी थांबत नाही तर घडणाऱ्या घटना-प्रसंगांचा पदर घेऊन लेखिका कधी निवेदकाच्या तर कधी-कधी पात्रांच्या माध्यमातून भाष्य घडवून आणते, त्याविषयी तर्क विकसित करते. याचा अर्थ ''येथे घटनाक्रमाला महत्त्व नसून, घडणाऱ्या घटनांवरच्या पात्रांच्या, विशेषत: केंद्रस्थानी असलेल्या स्त्री-पात्रांच्या प्रतिक्रियांना आहे.'' (थोरात हरिश्चंद्र, २००६, पृ. ९४) अशी हरिश्चंद्र थोरात यांनी गौरी देशपांडे यांच्या कादंबऱ्यांवरती केलेली टिप्पणी 'उत्खनन' बाबतही रास्त वाटते. दुनिया आठवणींची, गतकाळातील घटना-प्रसंगांची फक्त मांडणी करून थांबत नाही. तर त्या साऱ्या गोष्टींचा ती आजच्या काळाला जोडून अन्वयार्थ लावते. तिच्या आजपर्यंतच्या जगण्यात आलेल्या माणसांची ती नव्याने तपासणी करते. हे सर्व करताना ती काही गोष्टींची पुनर्मांडणी करते. कित्येकवेळा जगण्याविषयी काही मूलभूत प्रश्न उपस्थित करते. काही ठिकाणी जीवनाविषयीचे काही महत्त्वपूर्ण निष्कर्षही स्वत:च्या जगण्याचा, अभ्यासाचा संदर्भ घेऊन नोंदविताना दिसते. आपसूकच या साऱ्यातून कादंबरीतील घटना-प्रसंग, घटनांचा क्रम, वगैरे गोष्टी अलग पडून विचारप्रक्रियेच्या पातळीवरील एक नवे जग 'उत्खनन' मधून आकारास येते.

लेखिकेने कादंबरीला दिलेले शीर्षकही कल्पक आणि कादंबरीतील कथासूत्राशी, आशयसूत्राशी नाळ जोडणारी आहे. मुळात दुनिया ही 'पुरातत्त्वशास्त्र' या विषयाची प्राध्यापिका आहे. आणि पुरातत्त्वशास्त्राच्या अभ्यासातील, संशोधनातील एक महत्त्वाचे साधन म्हणजे 'उत्खनन'. त्यामुळे 'प्राध्यापक' आणि 'संशोधक' म्हणून तिचा उत्खननाशी जवळचा संबंध येतो. या अर्थी उत्खननचा संबंध कथानकाशी सांगता येतो. शिवाय संपूर्ण कादंबरीत 'उत्खनन' ही संज्ञा या - ना - त्या कारणाने प्रतिमेच्या पातळीवर वावरते. लेखिका कथानकाच्या ओघात 'उत्खनन' वरती वाचकांचे पुन:पुन्हा लक्ष केंद्रीत करून त्याचा अन्वयार्थ प्रत्यक्ष कथासूत्राशी, त्यांना अपेक्षित असलेल्या आशयसूत्राशी जोडून घेण्याचा प्रयत्न करते.

उदा. - ''माझ्या मनातल्या जित्या-मृतांच्या उत्खननांतून स्वत:ला सोडवून टाकायची सूचना माझ्या पन्नाशीत, तिशीही न गाठलेल्या सतीने हसत केली होती.'' (देशपांडे गौरी, २००३, पृ. ६१)

'' तुला ना दुनिया, आयुष्यांनी तुझ्या उत्खननासारखं उलगडायला हवं असतं!'' (पृ. ६७)

''आणि कुठे तरी , उत्खननातही हाती लागू नये इतक्या खोल ते सारे रूखरूखत रेंगाळलेले होते हा अभयाचा तर्क खरा होता.'' (पृ. ७०)

वरील नमूद केलेल्या आणि यासारखे प्रत्यक्ष कादंबरीत आढळणाऱ्या आणखिन काही विवेचनाधारे असे म्हणता येईल की, लेखिका एका प्रमुख प्रतिमेवरती वाचकांचे लक्ष वेधून त्याच्या माध्यमातून वाचकाला घटना-प्रसंगांच्या तळापासून वेध घेण्यास भाग पाडते आणि या सगळ्या संमिश्रणातून अनुभवांचा समक्षपणे प्रत्यय घडविते.

'जीवनाच्या उत्खननातून हाती आलेले काही निष्कर्ष' असेही काहीसे स्वरूप 'उत्खनन'ला आलेले आहे. म्हणजे १८-१९ व्या वर्षापासून पन्नाशीपर्यंत जगलेल्या जीवनाचं 'उत्खनन' म्हणून आत्मसंवादाच्या पातळीवर जगण्यातील कित्येक घटनाप्रसंगांचे-व्यक्तीचे-व्यक्तींच्या विविधांगी वर्तनाचे विश्लेषण करत दुनिया काही निष्कर्षापर्यंत येते.

उदा.-

१. ''हे आहे' आणि ते स्वीकारावे, क्वचित बदलायला बघावे, आणि सर्वसाधारणपणे, हवे ते जे मिळते त्याबद्दल कृतज्ञ राहावे, नको ते जे वाट्याला येते त्याच्याशी जमेल तसा मुकाबला करावा.'' (पृ. ५)

२. ''काळ अखेर बऱ्याच जखमा बुजवतो हेच खरे. किंवा असे म्हणावे, की बुजवत नाही, पण त्या गुपचूप मनात वागवता येतील इतपत त्यांच्या दुःखाची धार कमी करतो.'' (पृ. ५४)

३. ''कुणाशीही कधीच असंमजसपणे, असभ्यपणे वागायला लागत नाही. समजावून सांगितलं, ठामपणे काही पटवलं तर पटवून घ्यायला लोक तयार असतात.'' (पृ. ९०)

अशा स्वरूपाचे आणखी काही नमुने कादंबरीत (पृ. ३, १४, २०,६४,९०,१०१, ११२ इ.) दाखवता येतात. एकूणच प्रस्तुत कादंबरीत ह्या गोष्टी कथासूत्राशी, आशयाशी एकरूप होऊन गेल्याने कांदबरीला चिंतनशीलतेचे स्वरूप प्राप्त झाले आहे.

– ४ –

मुख्यत्वे 'उत्खनन' मधून येणारी आशयसूत्रे मूलभूत स्वरूपाची आहेत. वरील विवेचनाच्या, विश्लेषणाच्या आधारे असेही म्हणता येईल की, या सर्वांची प्रस्तुत कादंबरीत झालेली अभिव्यक्तीही रूपाच्या भानासह गंभीरपणे झाली आहे. परंतू संपूर्ण कादंबरी अभ्यासत असताना एका पातळीवरील उणीव मात्र कायम टिकून रहाते. या कादंबरीत लेखिका लग्न, नातेसंबंध, नैतिकता अशा संस्थात्मक गोष्टीबाबत बोलताना त्यातील विरोधाभास, अन्याय, अंतर्विरोध वाचकासमोर उलगडत जाते. याविषयी कालबाह्य झालेली, कोंडी निर्माण करणारी रचनाही लेखिका शक्य तेथे नाकारते आहे. आवश्यक त्या ठिकाणी नव्या मूल्यांची मांडणी करण्याचा प्रयत्नही करते आहे. परंतु हे सर्व करताना एक मर्यादित स्वरूपाचे जीवनचित्रण, ठरलेली काही पात्रे ही तिच्या लेखनाचा विषय होतात. या पार्श्वभूमीवर 'उत्खनन' मधील जीवनाविषयीचे चित्रण लक्षात घेता समाजातील विशिष्ट थराविषयीचेच दर्शन

घडते. म्हणजे मध्यमवर्गीय, उच्च मध्यमवर्गीय जगण्याचा स्तर, त्यांची म्हणून असणारी विशिष्ट प्रश्न, समस्या, दु:खांची कारणे अशी मर्यादित चौकट कादंबरीला आली आहे. एकुणात प्रेम, लग्न, नातेसंबंध, नैतिकता इ. विषयीची चर्चा व्यापक समाजवास्तव गृहीत धरल्याशिवाय आकार धरू शकत नाही. कारण मुळात ज्या गोष्टीविषयी लेखिका बोलते त्या गोष्टी समाजामध्ये संस्थात्मक पातळीवर वावरतात. आणि मग अशा चर्चेच्या पातळीवर प्रस्तुत कादंबरीला व्यापक समाजवास्तवाच्या चित्रणाची आवश्यकता होती, असे वाटू लागते. परंतु अशाप्रसंगी काही विशिष्ट पात्रांच्या परिघाबाहेर जावून लेखिकेला कोणताही सामाजिक, सांस्कृतिक संदर्भ घेण्याची आवश्यकता वाटत नाही.

एकाचवेळी प्रत्येक कादंबरीत ह्या सगळ्या गोष्टींची मांडणी होईलच असे नाही. परंतु अशावेळी अनुभव विश्वातील व्यापकपणा, लेखकाची व्यापक संवेदनशीलता, चित्रित पात्रांना आलेले प्रातिनिधिक स्वरूप यांने कादंबरीतील आशयसूत्राला सार्वत्रिकतेचे, सार्वकालिकतेचे परिमाण प्राप्त करून देतात. म्हनजे अनुभवविश्वाला सार्वत्रिकता प्राप्त करून देण्याची अशी क्षमता जर प्रस्तुत कादंबरीला लाभली असती तर लेखिकेच्या सांगण्याला आणखिन अर्थपूर्णता आली असती. याचा परिणाम कादंबरीतील पात्रांच्या स्वतंत्रपणे जगण्याला आणि असे जगत असताना आपसूकच येणाऱ्या सामाजिक, आत्मिक पातळीवरील संघर्षाला खोल जाणीव प्राप्त झाली असती.

असे जरी असले तरी आशयसूत्राचे वेगवेगळे पदर 'उत्खनन' मधून येतात. शिवाय कादंबरीकाराला असाव्या लागणाऱ्या नावीन्यात्मक दृष्टीचे प्रतिबिंब या कादंबरीतून दिसून येते. यातून मानवी नातेसंबंधातील विशुद्धतेचा शोध घेताना 'लेखक' म्हणून स्वत:ला असाव्या लागणाऱ्या निर्णायक भूमिकेचे, विषयाच्या सूक्ष्म आकलनाचे, अभिव्यक्तीतील अभिनिवेष वजा करून राहणाऱ्या संयमाचे, कादंबरीच्या कलामूल्यांचे , कादंबरी रचनातंत्रातील कौशल्याचे भान जागृत ठेवण्यात गौरी देशपांडे 'उत्खनन' मध्ये यशस्वी झाल्या आहेत.

**संदर्भ :**


इनामदार-साने, रेखा : 'गेल्या अर्धशतकातील स्त्री कादंबरीकारांची कामगिरी', गेल्या अर्धशतकातील मराठी कादंबरी, संपा. विलास खोले, लोकवाङ्मयगृह प्रकाशन, मुंबई, २००२.

थोरात, हरिश्चंद्र : 'गौरी देशपांडे यांच्या कादंबऱ्या', 'कादंबरीविषयी', पद्मगंधा प्रकाशन, पुणे, २००६.

दामले, अनिल : 'गौतमची गोष्ट', पाप्युलर प्रकाशन, मुंबई, १९९८.

देशपांडे गौरी : 'उत्खनन', मौज प्रकाशन, मुंबई, दु. आ., २००३.

मालशे स. ग. / मालशे मिलिंद (अनु.) : 'कलेची मूलतत्त्वे' – महा. राज्य साहित्य संस्कृती मंडळ प्रकाशन, मुंबई, २००४. (मूळ ग्रंथ : 'The Principles of Art' - R. G. Collingwood)


टीप : प्रस्तुत लेखात पृष्ठ क्रमांक देऊन दिलेली अवतरणे ही गौरी देशपांडे यांच्या 'उत्खनन' (मौज प्रकाशन, मुंबई, २००२) या कादंबरीतील आहेत.

*****